करण्याबाबतही प्रयत्न सुरू आहेत. नाट्यपरिषदेच्या सांगोला, अकलूज - माळशिरस येथे नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत.

२. ज्या रंगमंच कामगारांच्या मुलांना शालांत परिक्षेत ७५ टक्क्यापेक्षा जास्त गुण मिळाले आहेत त्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्यात येते. यावर्षी कु. महेश भरत वर्दम या मुलाला रू. १४,०००/- आर्थिक मदत करण्यात आली.

३. यावर्षी प्रथमच नाट्यपरिषदेतर्फे प्रायोगिक राज्य नाट्य स्पर्धेत श्री. प्रदीप वैद्य लिखित 'एक रिकामी बाजू' नाटक सादर करण्यात आले. कै. वसंत जाधव एकांकिका स्पर्धेत 'जेवणावळ' व कै. डॉ. प्रा. लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धेत 'ती आणि आपण' या एकांकिका परिषदेतर्फे सादर करण्यात आल्या. त्या सर्वांचे दिग्दर्शन डॉ. अनिल बांदिवडेकर यांनी विनामूल्य केले आहे.

४. दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नाट्यपरिषदेची सुधारित घटना तयार करण्यासाठी घटना समिती नेमण्यात आली. श्री. गुरुनाथ दळवी हे घटना प्रमुख म्हणून व श्री. चंद्रकांत येडूरकर, ॲड. देवेंद्र यादव, श्री. आनंद भोसले, श्री. सुनिल महाजन, श्री. बबन गवस आणि श्री. नाथा चितळे हे सदस्य म्हणून काम पाहतील असे ठरले.

## यशवंत नाट्यमंदिर

आपल्या यशवंत नाट्य मंदिरास चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणाऱ्या कार्यक्रमात उत्तोरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, इतर भाषिक कार्यक्रम शुटींग, सभा, संगीताचे कार्यक्रम यांचा समावेश आहे. या कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिद्ध व्यक्तींनी नाट्यगृहास भेट दिली.

## ९५ वे नाट्य संमेलन २०१५
## बेळगांव

९५ व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृध्दिसाठी नाट्यलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांक रू. २१,०००/-, द्वितीय क्रमांक रू. ११,०००/-, तृतीय क्रमांक रू. ७,०००/- व विशेष पुरस्कार म्हणून रू. ३,०००/- आणि उत्तेजनार्थ एकूण तीन पुरस्कार प्रत्येकी रू. १,०००/- अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे '९५ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' बेळगांव शाखेच्या विद्यमाने 'बेळगांव' येथे दि. ७ फेब्रुवारी आणि ८ फेब्रुवारी २०१५ रोजी ज्येष्ठ अभिनेत्री मा. श्रीमती फैय्याज यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या सोहळ्यात विविध करमणूकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या सोहळ्याचा उद्घाटन समारंभ शनिवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता आणि समारोप सोहळा रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी २०१५ रोजी सायं. ५.०० वा. संपन्न झाला.